https://snapfrom.com/ https://instagramvideodownloader.net/ https://instadl.app/



# अधिवेशन १७ जुलैपासून

## तीन आठवडे कालावधीचा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन तीन आठवड्यांपर्यंत चालविण्याचा निर्णय शुक्रवारी विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन १७ जुलै २०२३ रोजी सुरू होणार असून हे अधिवेशन ४ ऑगस्ट २०२३ पर्यंत चालेल. या १९ दिवसांच्या कालावधीतील अधिवेशनाचे प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस १५ असून शनिवार आणि रविवार असे चार दिवस सार्वजनिक सुट्ट्यांचे असणार आहेत.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला येत्या १७ जुलैपासून सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर विधिमंडळाच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक शुक्रवारी विधानभवनात झाली. या बैठकीत झालेल्या निर्णयाची घोषणा विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली. विधिमंडळाच्या शतकोत्तर प्रवासाच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळ वाटचालीचे दस्ताऐवजीकरण करण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सूचित केले. तर विधिमंडळाचा गौरवशाली इतिहास संदर्भग्रंथाच्या माध्यमातून जतन करण्याचे तसेच विविध परिसंवादाद्वारे विधिमंडळाच्या आजपर्यंतच्या कामकाजातून महत्त्वपूर्ण घटना, प्रसंगांना उजळा देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्याची सूचना डॉ. गोऱ्हे यांनी मांडली. मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवानिमित्तच्या पार्श्वभूमीवर अभिनंदनाचा ठराव अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सादर करण्याबाबत जयंत पाटील, अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात यांनी मांडलेल्या सूचनेवर अध्यक्ष नार्वेकर यांनी यावेळी संमती दर्शवत ठराव मांडण्याचा निर्णय घेतला.

विधानभवनात पार पडलेल्या या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह छगन भुजबळ, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, गिरीश महाजन, अशोक चव्हाण, उदय सामंत, अमिन पटेल, आशीष शेलार, नरहरी झिरवाळ, तसेच विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी उपस्थित होते.

विद्याधर राणे

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची पूर्वतयारी सध्या सुरू आहे.

### नीलम गोऱ्हे यांच्या विरोधातील प्रस्ताव मागे

भाजपकडून नीलम गोऱ्हे यांच्यावर दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव मागे घेणार असल्याचे समजते. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत प्रवीण दरेकर यांनी हा प्रस्ताव मांडला होता. तर प्रसाद लाड यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले आहे. उपसभापती नीलम गोऱ्हे पक्षपाती भूमिका घेत असल्याचा आरोप दरेकर यांनी विरोधीपक्ष नेते असताना केला होता. यानंतर त्यांनी गोऱ्हे यांच्याविरोधात सभापतींकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. मात्र आता हा दाखल करण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव मागे घ्यावा असा प्रस्ताव दरेकर यांनी मांडला आहे.

### महाविकास आघाडीची बैठक

दरम्यान, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीपूर्वी महाराष्ट्र विकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला राष्ट्रवादीचे जयंत पाटील, काँग्रेसचे अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात, शिवसेनेचे आदित्य ठाकरे आदी उपस्थित होते. या बैठकीत पावसाळी अधिवेशनातील रणनीतीवर चर्चा करण्यात आली.

# निवडणुकीची घोषणा नाही

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

### राज्य निवडणूक आयोगाचा खुलासा

राज्य निवडणूक आयोगाने ५ जुलै रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील मतदारयादीबाबतची (कट ऑफ डेट) अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. ही अधिसूचना असून त्यात प्रत्यक्षात कोणत्याही निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आलेली नाही. शिवाय ग्रामपंचायत निवडणूक वगळता अन्य सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने 'जैसे थे' आदेश दिले आहेत. त्यामुळे निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असा खुलासा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी शुक्रवारी केला.

राज्य निवडणूक आयोगाने ५ जुलै २०२३ रोजी एक आदेश प्रसिद्ध केला आहे. त्यात १ जुलै २०२३ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदारयाद्या सप्टेंबर २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत होणाऱ्या महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती , जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक तसेच, पोटनिवडणुकांसाठी मतदारयाद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील, असे अधिसूचित करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे गेली तीन वर्ष रखडलेल्या महापालिका, जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान होतील, अशी चर्चा सुरू होती.

या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने शुक्रवारी खुलासा केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदारयाद्या तयार करण्यात येत नाहीत. त्यासाठी विधानसभा मतदारसंघांच्या मतदारयाद्या जशाच्या तशा घेवून केवळ प्रभागनिहाय विभाजित केल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी संभाव्य सर्वच सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकांसाठी विधानसभा मतदारसंघांच्या याद्या वापरण्यासाठी एक विशिष्ट तारीख (कट ऑफ डेट) निश्चित केली जाते. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी संभाव्य सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकांसाठी १ जुलै २०२३ ही कट ऑफ डेट निश्चित करण्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे, असे मदान यांनी म्हटले आहे.

### यापूर्वीही अशा अधिसूचना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभा मतदारसंघांच्या अद्ययावत मतदारयाद्या वापरण्यासाठीच वेळोवेळी कट ऑफ डेट निश्चित केली जाते आणि त्यासंदर्भातील अधिसूचनाही प्रसिद्ध केली जाते. यापूर्वीदेखील या स्वरूपाच्या अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या अधिसूचना म्हणजे प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम नसतो. अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीत सार्वत्रिक किंवा पोटनिवडणुका न झाल्यास, पुन्हा नव्याने कट ऑफ डेट निश्चित करण्यासाठी अधिसूचना प्रसिद्ध केली जाते, असेही मदान यांनी स्पष्ट केले आहे.

## 'राहुल यांच्यावर द्वेषापोटी कारवाई'

मुंबई : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात खोटी तक्रार करून राजकीय द्वेषातून कारवाई करण्यात आली असून, राहुल गांधी यांनी कोणत्याही समाजाचा अपमान केलेला नाही. राहुल यांना घाबरवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे असा आरोप प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.


प्रपत्र जी
स्वारस्याची अभिव्यक्ती करिता आमंत्रण
सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड
"बांधा-वापरा-हस्तांतरण" (बीओटी) तत्त्वावर "चिन छोटी - कामण - अंजूरफाटा ते माणकोली रोड म. रा. म. क्र. ४" वरील "टोल प्लाझा" चे कार्यान्वितीकरण
(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्यूशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ३६ए(१) अंतर्गत)

संबंधित तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | पॅन/सीआयएन क्र. सह कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड CIN: U45200HR2013PTC048979 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ५१०, ५वा मजला, एबीडब्ल्यू टॉवर, इफ्को चौक, एमजी रोड, गुडगाव, हरियाणा १२२००२ |
| ३. | वेबसाइटची यूआरएल | सीडीची वेबसाइट नाही |
| ४. | बहुतेक स्थावर मालमत्ता असलेल्या ठिकाणाचा तपशील | मुंबई (महाराष्ट्र) |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनी टोल प्लाझा चालवते-"बांधा-वापरा-हस्तांतरण" (बीओटी) तत्त्वावर "चिन छोटी-कामण-अंजूरफाटा ते माणकोली रोड म. रा. म. क्र. ४" येथे |
| ६. | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे प्रमाण आणि मूल्य | आर्थिक वर्ष २०२१-२२ नुसार प्रमाण: लागू नाही मूल्य- एकूण महसूल-रु. १९०२.८६ लाख |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | सीआयआरपीच्या तारखेनुसार ७० कर्मचारी (अंदाजे) |
| ८. | दोन वर्षांची शेवटची उपलब्ध आर्थिक विवरणपत्रे (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या, प्रक्रियेतील त्यानंतरच्या घडामोडीच्या संबंधित तारखांसह इतर तपशील येथे उपलब्ध आहेत: | अ. दोन वर्षांची शेवटची उपलब्ध आर्थिक विवरणपत्रे (अनुसूचीसह)- lihalaco@gmail.com आणि cirp.supremev@gmail.com वर मेल करून मिळवता येतील. ब. कर्जदारांची यादी आयबीबीआयची वेबसाइट, म्हणजेच https://ibbi.gov.in/en/claims/claim-process/U45200HR2013PTC048979 वर उपलब्ध आहे. क. प्रक्रियेतील पुढील घडामोडीच्या संबंधित तारखा I. संभाव्य रिझॉल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझॉल्यूशन प्लॅनसाठी विनंती जारी करण्याची तारीख-२६ जुलै, २०२३ ii. रिझॉल्यूशन प्लॅन सादर करण्याची शेवटची तारीख-०४ सप्टेंबर, २०२३ |
| ९. | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझॉल्यूशन अर्जदारांसाठी पात्रता येथे उपलब्ध आहे: | lihalaco@gmail.com आणि cirp.supremev@gmail.com वर मेल करून मिळवता येईल |
| १०. | स्वारस्याची अभिव्यक्ती प्राप्तीकरिता शेवटची तारीख | २४ जुलै, २०२३ |
| ११. | संभाव्य रिझॉल्यूशन अर्जदारांची अस्थायी यादी जारी करण्याची तारीख | २६ जुलै, २०२३ |
| १२. | अस्थायी यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ३१ जुलै, २०२३ |
| १३. | ईओआय सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | lihalaco@gmail.com, cirp.supremev@gmail.com |

राजेश लिहाला
इंटेरिम रिझॉल्यूशन प्रोफेशनल
सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड
आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००५२५/२०१७-२०१८/१०९५०
एएफए पर्यंत वैध २८/११/२०२३
११, कुक्ड लेन, कोलकाता ७०० ०६९
दिनांक: ०७ जुलै, २०२३
ठिकाण: कोलकाता


# राज यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

नाशिक जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावण्यात येत असल्याच्या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे भेट घेतली. शेतकऱ्यांच्या मागे कर्जवसुलीसाठी तगादा न लावण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे दिले.

सायंकाळी सव्वाचारच्या सुमारास राज ठाकरे यांनी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. राज्यात अद्याप चांगल्या प्रमाणात पावसाला सुरुवात झालेली नाही. पेरण्यांचे प्रमाणही कमी आहे, अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा सहकारी बँक जिल्ह्यातील अल्प कर्जदार शेतकऱ्यांच्या मागे वसुलीसाठी तगादा लावत असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून वसुलीसाठी तगादा न लावण्याचे निर्देश दिले. यासंदर्भात ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने २० एप्रिल २०२३ रोजी मुख्यमंत्री शिंदे यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेतली होती. या बैठकीत नाशिक जिल्हा बँक सक्तीने वसुली करत असल्याचा मुद्दा चर्चिला गेला होता. त्यामुळे आजच्या भेटीत ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांसमवेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांसोबतच वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास आदी विषयांवर चर्चा केली.

### शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत चर्चा

### युतीबाबतही विचारविनिमय?

या भेटीत शेतकऱ्यांच्या प्रश्नाबरोबरच राज्यातील सध्याच्या राजकारणाबाबतही मुख्यमंत्री शिंदे आणि राज ठाकरे यांच्यात चर्चा झाल्याचे कळते. गेल्या काही दिवसांपासून मनसे आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्यात मनोमिलन होणार असल्याबाबतची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर या बैठकीत प्रामुख्याने चर्चा झाल्याचे कळते. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत कोणत्याही प्रकारची तडजोड करू नका, असा सल्ला शिंदे यांनी दिल्याचे समजते. त्यावर राज ठाकरे यांनीही आम्ही कोणासोबत युती करण्याच्या मनस्थितीत नसून आम्ही स्वबळावर निवडणुकांना सामोरे जाणार असल्याचे सांगितल्याचे कळते. महाविकास आघाडीमध्ये फूट पाडत अजित पवारांच्या निमित्ताने राष्ट्रवादीलाही शिंदे-फडणवीस यांनी सरकारमध्ये सहभागी करून घेत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला पुरते एकटे पाडले आहे. अशा परिस्थितीत आता पुन्हा उद्धव ठाकरे यांना कोणत्याही पक्षाचा आधार मिळू नये यासाठीच मुख्यमंत्री शिंदे प्रयत्नशील असून त्यादृष्टीने ते रणनिती आखत आहेत.

# अजित पवार यांना शिंदेंच्या शेजारचे दालन

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मंत्रिमडळात समावेश झाल्यानंतरही मंत्रालयात कोणत्या मंत्र्याला कोणत्या मजल्यावर कार्यालय मिळते याला फार महत्त्व आहे, त्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मंत्रालयात नेमके कुठे कार्यालय मिळणार याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. मात्र अखेर अजित पवार यांनी जोर लावल्याने त्यांना मंत्रालयातील मुख्य इमारतीमध्ये सहाव्या मजल्यावर कार्यालय मिळाले आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अगदी बाजूचेच कार्यालय देण्यात आले आहे.

मंत्रिमंडळात कोणत्या मंत्र्याला कोणते खाते मिळते यावरून जसे त्याच्या राजकीय ताकदीचा अंदाज लावला जातो, तसेच त्याला मंत्रालयात कुठे दालन मिळते, त्याला कोणता बंगला मिळतो यावरूनही अनेक अंदाज बांधले जातात. गेल्याच रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर मागील पाच दिवस त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून मंत्रालयातील दालनाचा शोध घेतला जात होता. या शोध मोहिमेनंतर अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मंत्रालयातील मुख्य इमारतीमध्ये सहाव्या मजल्यावर दालन मिळाले आहे. सामान्य प्रशासन विभागाने याविषयी शासन निर्णय काढून त्यांचे कार्यालय निश्चित केले आहे. आता सहाव्या मजल्यावर मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कार्यालये असतील.

# शरद पवार यांची आज सभा

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवारसमर्थक आमदारांनी बंड करून पक्षात फूड पाडल्यानंतर या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची आज, शनिवारी नाशिक जिल्ह्यातील येवला विधानसभा मतदारसंघात सभा होत आहे. शरद पवार यांच्या राज्यव्यापी दौऱ्याची सुरुवात भुजबळ यांच्या येवला येथून होत आहे.

आज सकाळी ८ वाजता सिल्व्हर ओक या निवासस्थानावरून शरद पवार हे दौऱ्यावर निघणार आहेत. ठाणे, भिवंडी, पडघा, शहापूर, इगतपुरी या मार्गावर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते ठिकठिकाणी जोरदार स्वागत करतील, असे पक्षप्रवक्ते महेश तपासे यांनी सांगितले.

देशपातळीवर अनेक नेत्यांनी शरद पवार यांना पाठिंबा दिला आहे. स्वतः राहुल गांधी यांनी शरद पवार यांची भेट घेतली. आता बंगळुरूमध्ये होणाऱ्या विरोधी पक्षांच्या बैठकीला पवार उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती तपासे यांनी दिली.

# 'बहुतांश आमदार-खासदार आमच्यासोबत'

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

### प्रफुल पटेल यांचा दावा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कोणीही बंडखोरी केलेली नसून, राष्ट्रवादीत कसलीच फूट पडलेली नाही. राष्ट्रवादीतील बहुतांश आमदार आणि खासदार आपल्यासोबत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा आपलाच असल्याचा दावा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते खा. प्रफुल पटेल यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कॅबिनेटमंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवारी मुंबईत केला.

राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी गुरुवारी दिल्लीत बोलाविलेली राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक ही पूर्णपणे बेकायदा होती. त्या बैठकीला काहीच अर्थ नव्हता. काही लोकांकडून चुकीची माहिती पसरविली जात असून, संभ्रम निर्माण केला जात आहे असा थेट आरोप गटाचे नेते प्रफुल पटेल यांनी केला. उभय सभागृहातील आमदार आणि खासदारांचे संख्याबळ पाहता संपूर्ण पक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठीशी आहे. अजित पवार यांची पक्षाचे नेते म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडे ३० जून रोजीच राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह आणि पक्षाच्या नावाच्या मागणी करण्यात आल्याचे पटेल यांनी सांगितले.

शरद पवार यांनी दिल्लीत घेतलेल्या बैठकीत खा. प्रफुल पटेल, सुनील तटकरे यांना निलंबित करण्याचा ठराव आणि शरद पवार हेच आमचे मुख्य नेते असा ठराव मंजूर करण्यात आला. परंतु पक्षाच्या घटनेबाबत अनेक प्रश्न निर्माण करून शरद पवार यांची दिल्लीतील बैठक बेकायदा होती, असा दावा पटेल यांनी केला.

**चिन्ह आम्हालाच मिळायला हवे...**

आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहोत. म्हणून चिन्ह आणि इतर गोष्टी आम्हाला थेट मिळायला पाहिजेत, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली. ही पक्षात फूट नाही अथवा वेगळा गटसुद्धा नाही, असेही पटेल म्हणाले.


## भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ
## Securities and Exchange Board of India

### सुनावणीची सूचना

याद्वारे कळविण्यात येत आहे की, खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या नोटीसींना सुनावणीची सूचना जारी करण्यात आली होती. रेकॉर्डवर उपलब्ध असलेल्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सुनावणीची सूचना दिली जाऊ शकली नाही. सुनावणीच्या सूचनांचे तपशील खालील तक्त्यामध्ये दिले आहेत.

| नोटीसींचा क्र. | नाव | पॅन | पत्ता | ईमेल आयडी | नोटीस दिनांक व क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री. प्रफुल्ल सुभाषचंद्र भट | एएमईपीबी०१५५एफ | बी/२३०६, स्काय फ्लेमा, दोस्ती फ्लेमिंगो, चायना मिल कंपाउंड, टी जे मार्ग, परेल, शिवडी, मुंबई, महाराष्ट्र - ४०००१५<br>फ्लॅट क्र. ३०३, तिसरा मजला, विवरेया टॉवर, बी२, साने गुरुजी मार्ग, हिंदुस्थान स्पिनिंग अँड वायर मिल्स कंपाउंड, महालक्ष्मी, मुंबई - ४०००११<br>प्लॉट क्र. १७/१८/१, संभाजी नगर, गौरी पार्क, न्यू पार्वती नगर, जळगाव, महाराष्ट्र - ४२५००१<br>युनिट ९०८-९०९-९१०, सी विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला सिटी, एस बी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३<br>फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, टॉवर-बी, विवरेया इमारत, डॉ. ए. एल. नायर मार्ग, जेकब सर्कल जवळ, मुंबई - ४०००११<br>प्लॉट क्र. डी ३७, सेक्टर ९, बी१ बेसमेंट फ्लोअर, चित्रकुट योजना, वैशाली नगर, जयपूर -३०२०२१ | bhatprafulla@gmail.com, cafinance07@gmail.com, great.star347@gmail.com, sphinvestment@yahoo.com, prafulla.bhat@rediffmail.com | सेबी/एचओ/सीएफआयडी/सीएफआयडीपी/ओडब्ल्यू/२०२३/२७०८८/१ दिनांक ०५ जुलै, २०२३ |

नोटीसींना भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ, सेबी भवन - II, प्लॉट क्र. सी-७, 'जी' ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई - ४०००५१ येथे १३ जुलै, २०२३ रोजी दुपारी ३:०० वाजता सुनावणीची संधी देण्यात आली आहे.

नोटीसींना याद्वारे महामंडळ वित्त अन्वेषण विभाग (सीएफआयडी), भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ, सेबी भवन II, प्लॉट क्र. सी-७, 'जी' ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१ येथून सुनावणीची सूचना प्राप्त करण्याचा सल्ला दिला जातो. नोटीसी सेबीची अधिकृत वेबसाइट (www.sebi.gov.in) वरील "अननुपालित समन्स/नोटिसा" या शिर्षकाखाली सुनावणीच्या सूचनेची प्रत डाउनलोड करू शकतात किंवा rahuld@sebi.gov.in (एओ) आणि sivarammpk@sebi.gov.in (व्यवहार अधिकारी) वर विनंती पाठवून सुनावणीच्या सूचनेची प्रत मिळवू शकतात. नोटीसींना जर ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे सुनावणीची इच्छा असल्यास, त्यांना वर नमूद केलेल्या ईमेलवर सूचित केले जाऊ शकते. उत्तर न मिळाल्यास, किंवा नोटीस किंवा अधिकृत प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर न राहिल्यास, सेबी रेकॉर्डवर उपलब्ध सामग्रीच्या आधारे या प्रकरणात पुढे जाईल.

ठिकाण: मुंबई

शिवराम कृष्णन
उपमहाव्यवस्थापक

सीबीसी १५२०४/११/००८१/२३२४



प्रपत्र जी
स्वारस्याची अभिव्यक्ती ("ईओआय") करिता आमंत्रण
परफेक्ट इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स लिमिटेड
ऑटोमोटिव्ह अभियांत्रिकी ॲक्सेसरीजच्या निर्मितीमध्ये कार्यरत
(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्यूशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ३६ए(१) अंतर्गत)

संबंधित तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | पॅन/सीआयएन/एलएलपी क्र. सह कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | परफेक्ट इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स लिमिटेड पॅन: एबीसीपी६१८०ई CIN: U28920MH1964PLC012880 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ११०१, विराज टॉवर्स, अंधेरी कुर्ला रोड जंक्शन, डब्ल्यू. ई. हायवे, अंधेरी (पू), मुंबई, महाराष्ट्र-४०००६९ |
| ३. | वेबसाइटची यूआरएल | http://www.peclindia.com |
| ४. | बहुतेक स्थावर मालमत्ता असलेल्या ठिकाणाचा तपशील | १७२, तुंगार्ली, लोणावळा, जिल्हा पुणे, महाराष्ट्र-४१०४०३ |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या मुख्य उत्पादने/सेवा कार्यालयाची (कोणतेही असल्यास) स्थापित क्षमता | वॉल्व सीट्स इन्सर्ट्स- ९० लाख पिसेस प्रति वर्ष, वॉल्व गाइड्स-२१ लाख पिसेस प्रति वर्ष |
| ६. | आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे प्रमाण आणि मूल्य - | अ. क्र. १; तपशील: प्रचलनातून महसूल; आर्थिक वर्ष २०२२: ४४,५२,००,४४०; आर्थिक वर्ष २०२१: २१,६८,६७,७९१ |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | वेतनावर: कर्मचारी: ११० कामगार: ६६ कंत्राटी तत्वावर: कामगार: ११७ |
| ८. | दोन वर्षांची शेवटची उपलब्ध आर्थिक विवरणपत्रे (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या, प्रक्रियेतील त्यानंतरच्या घडामोडींच्या संबंधित तारखांसह इतर तपशील येथे उपलब्ध आहेत: | http://arck.in, केस सूची अंतर्गत "परफेक्ट इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स लिमिटेड" |
| ९. | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझॉल्यूशन अर्जदारांसाठी पात्रता येथे उपलब्ध आहे: | रिझॉल्यूशन प्लॅनसह रिझॉल्यूशन प्रोफेशनल ("आरपी") शी संपर्क साधण्यासाठी रिझॉल्यूशन अर्जदारांसाठी किमान पात्रता निकष (एकटे, संयुक्तपणे किंवा कंसोर्टियममध्ये) :- • बॉडी कॉर्पोरेट्स आणि व्यक्तिगत/ व्यक्तींसाठी: तपशीलवार ईओआयच्या परिशिष्ट बी मध्ये नमूद केल्यानुसार कागदोपत्री पुराव्यांद्वारे समर्थित किमान निव्वळ मूल्य रु. १० कोटी आणि त्याहून अधिक • एआरसी*/एनबीएफसी/एआयएफ सह वित्तीय संस्थांसाठी: तपशीलवार ईओआयच्या परिशिष्ट बी मध्ये नमूद केल्यानुसार कागदोपत्री पुराव्यांद्वारे समर्थित रु. १०० कोटी आणि त्यावरील गुंतवणुकीसाठी उपयोजित किंवा प्रतिबद्ध निधीच्या व्यवस्थापनाअंतर्गत किमान मालमत्ता *एआरसीचा सहभाग भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियम आणि विनियमांच्या अधीन आहे # उपरोक्त दोन श्रेणीतील अर्जदारांमध्ये भिन्न पात्रता निकष असल्यास, पात्रता संघातील त्यांच्या वाट्याच्या प्रमाणात गणली जाईल. संपूर्ण तपशील/तपशीलवार ईओआय वेबसाइट www.arck.in वर उपलब्ध आहे किंवा perfectengineering.ibc@gmail.com वर ई-मेलद्वारे मागवली जाऊ शकते. |
| १०. | स्वारस्याची अभिव्यक्ती प्राप्तीकरिता शेवटची तारीख | २३.०७.२०२३ |
| ११. | संभाव्य रिझॉल्यूशन अर्जदारांची अस्थायी यादी जारी करण्याची तारीख | २७.०७.२०२३ |
| १२. | अस्थायी यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ०१.०८.२०२३ |
| १३. | ईओआय सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | perfectengineering.ibc@gmail.com |

परफेक्ट इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स लिमिटेड करिता
अनिल कोहली, नियुक्त भागीदार आणि अधिकृत स्वाक्षरीकर्ता
एआरसीके रेझॉल्यूशन प्रोफेशनल्स एलएलपी - रिझॉल्यूशन प्रोफेशनल
आयबीबीआय/आयपीई-००३०/आयपीए-१/२०२२-२३/५००१३
एएफए पर्यंत वैध: २२.१२.२०२३
पत्ता: ४०९, अन्सल भवन, १६ के.जी. मार्ग, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली - ११०००१
ईमेल: perfectengineering.ibc@gmail.com
मोबा.: ९८१००७११८२
दिनांक: ०८.०७.२०२३
ठिकाण: मुंबई



महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
पहिला मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

### जाहिर ई-निविदा सुचना

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या लोकाभिमुख योजना, विकास प्रकल्प इ. ची माहिती जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी जाहिराती तयार करण्याचे, वितरणाचे व सर्वंकष जाहिरात मोहिमा आखणी व अंमलबजावणीचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दि.१६.०३.२०२० अन्वये सूचीबद्ध केलेल्या जाहिरात संस्थाद्वारे करण्याकरिता निविदा प्रक्रिया करुन संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्याकरिता नामांकीत व अनुभवी संस्थाकडुन ई-निविदा मागवित आहे.

निविदेसंदर्भातील अधिकची माहिती इच्छुक निविदाधारकांनी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावी.

निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार असून निविदा सादर करण्याचा अंतीम दिनांक १७/०७/२०२३ रोजी दु. ५.०० वाजेपर्यंत आहे.

दिनांक

सही/-
(संतोष वि.गावडे)
उप सचिव,
महसूल व वन विभाग

DGIPR/2023-2024/1966



मिरा-भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदीरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
ता.जि.ठाणे-४०१ १०१
बांधकाम विभाग

जा.नं. मनपा/साबां/निविदा/१८६/२०२३-२४ दि.०७/०७/२०२३

॥ निविदा सुचना क्र. १८६ ॥

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वर्सोवा ब्रिज ते घोडबंदर गावाशेजारी खाडी किनारा विकसीत करणे. (मुलभुत सोई सुविधांचा विकास योजना) कामी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारां विरूध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरू आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर **दि.18/07/2023 ते दि.31/08/2023** पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे वर **दि.01/09/2023** रोजी पर्यंत सायं.12.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा **दि.05/09/2023** रोजी सायं.12.30 वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

जा.क्र. मनपा/मावज/२२६/२०२३-२४
दि. ७/७/२०२३

सही/-
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

ठिकाण : भाईंदर
दिनांक : 07/07/2023


https://instadownload.app/ For More ePaper: https://www.fresherwave.com/ https://instadownload.app/